# ALL INDIA PEOPLE's SCIENCE NETWORK

Regd. No. 1787/1992

AIPSN Central Secretariat,
6, Kakkathoppu Street
O/O TNSF, MUTA Building,
MADURAI-625001.Tamilanadu

E-mail: gsaipsn@gmail.com
Ph: 94429 15101

**President: Dr. S.Chatterjee, General Secretary: Prof. P.Rajamanickam, Treasurer: Dr.S.Krishnaswamy**


माननीय महोदय,

ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क (AIPSN) या संस्थेच्या वतीने हे आवाहन मी आपल्यापर्यंत पोहोचवत आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन, समाजाभिमुख विज्ञान प्रसार आणि मानवतेसाठी विज्ञान या तत्वांवर काम करण्यासाठी भारतभरातल्या अनेक संस्था एकत्र येऊन AIPSN हे नेटवर्क तयार झालेले आहे.

वैज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे हे आपण जाणताच, आणि घटनेने आपण सगळेच त्याला बांधील आहोत.

नायसर, भुवनेश्वर येथे नुकत्याच झालेल्या AIPSNच्या द्विवार्षिक अधिवेशनामध्ये 'राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन' (NSTD) साजरा करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

आजच्या सामाजिक/ राजकीय परिस्थितीत धर्मनिरपेक्षता, समता, लोकशाही आणि विविधतेतून एकता ही भारतीय मूल्ये बळकट करण्याची गरज आहे. हे काम वैज्ञानिक दृष्टिकोन करू शकेल असा आमचा विश्वास आहे.

20 ऑगस्ट हा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यात त्यांनी आपले जीवन व्यतीत केले होते, त्यासाठी ठिकठिकाणी जाऊन लोकांना समजेल अशा भाषेत संवाद साधला होता. या विषयावरची त्यांची अनेक भाषणे प्रसिद्ध आहेत. 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या त्यांच्या मराठीतील पुस्तकामधील दोन उतारे या पत्रासोबत जोडलेले आहेत.

राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस व्यापक स्तरावर जोरदारपणे साजरा करण्याची गरज आहे. समविचारी संस्था, संघटना, शाळा, शिक्षक, व्यक्ती यांच्या सुसूत्र, सार्वत्रिक व सामूहिक प्रयत्नांशिवाय हे शक्य नाही. भारतीय राज्यघटनेची मूल्ये रूजविण्याचे काम तुम्ही आणि तुमची संस्था/संघटना अत्यंत बांधिलकीने करीत आहातच. ते लक्षात घेऊन आम्ही आपणास या व्यापक सामूहिक प्रयत्नात सामील होण्याचे आवाहन करीत आहोत.

AIPSN च्या वतीने शुभेच्छांसह,

**डॉ. सब्यसाची चॅटर्जी**

**अध्यक्ष**
**ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क**